सामना उत्सव
रविवार पुरवणी
गुरुजी
शोध

# शुभ संकल्पांची गुढी!



**येत्या मंगळवारी गुढीपाडवा. येणाऱ्या वर्षारंभी अशी सत्संकल्पाची गुढी उभारून आणि कृत्निश्‍चयाचं तोरण बांधून नववर्षाचं स्वागत आपल्याला करता आलं पाहिजे.**

चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे हिंदू वर्षारंभाचा दिवस. नवीन वर्ष आपल्यासाठी सुख व समृद्धी घेऊन यावे अशी प्रत्येकाची अपेक्षा असते. कर्मनियमांबाहेर कधी कोणाला काही मिळत नाही अथवा मिळालेले कोणाला हिसकावून घेता येत नाही. या वस्तुस्थितीचा विसर पडून 'मी' आणि 'माझे' कुटुंब याकरिता सदैव भौतिक अभिवृद्धीचीच अपेक्षा आपण नवीन वर्षाकडून ठेवत असतो. फक्त आपल्यापुरता आणि तोदेखील भौतिक सुखाचाच विचार करणारी ही सार्वभौम आणि सार्वकालिक मानसिकता बदलण्याची आवश्यकता प्राचीन हिंदू पूर्वसुरींना ज्ञात होती. म्हणूनच व्यक्तिगत कक्षेतही संपूर्ण विश्‍व सामावून घेणारी व्यापक मनोभूमिका तयार करण्यासाठी काही विशिष्ट संकल्पांचा किंवा व्रतांचा पुरस्कार आपल्या प्राचीन हिंदू संस्कृतीने केला आहे. छांदोग्य उपनिषदांतील दुसऱ्या अध्यायाच्या ११ ते २१ खंडांमध्ये सामवेदांचे अध्ययन करणाऱ्या उपासकांसाठी काही संकल्प किंवा व्रते सांगितली आहेत.

सामवेदाचे अध्ययन म्हणजेच साम्यव्रताची साधना होय. आपल्या अंतर्मनात असे पूर्ण समत्व साधण्यासाठी प्रथम व्रतरूप संकल्प सांगितला आहे, तो म्हणजे 'महामना: स्यात् तद् व्रतम्।' अर्थात 'उदार मनाचे बना, हे व्रत आहे!' आपले मन एवढे छोटे असते की, त्यात 'मी' आणि 'माझे' एवढ्यांनाच जागा असते. फक्त आपलंच दु:ख मोठं वाटणारा मनुष्य जीवनात काहीही साध्य करू शकत नाही. आपलं संकुचित मन विस्तृत करून पाहिलं तर लक्षात येईल की, जगातील इतर दु:खांपुढे आपली दु:खं अगदीच किरकोळ आहेत. इतरांच्या दु:खांचाही विचार करण्याइतकं आपलं मन व्यापक होईल, तेव्हाच त्याला महा-मन म्हणता येईल.

अशी व्यापक दृष्टी प्राप्त करण्याकरिता पुढील संकल्प सांगितला आहे, 'तपन्तं न निन्देत् तद् व्रतम्!' वसंतोत्सवाची रंगत ओसरायला लागली की, हळूहळू मनुष्याच्या लक्षात यायला लागतं, सूर्यमहाराज भयंकर उष्णता देत आहेत. अशा परिस्थितीत जरा पंखा बंद झाला की, मनुष्य लगेच उन्हाच्या नावे ओरडायला सुरुवात करतो. प्रस्तुत औपनिषदिक व्रत नेमके हेच सांगते की, आपल्या शारीरिक सुखात अडसर येतो म्हणून तापलेल्या सूर्याला कधीही नाव ठेवू नका. सोपवलेलं कार्य अविरतपणे करून तो निसर्गचक्र सुरू ठेवायला मदतच करतो आहे. उन्हाळ्यानंतर पुन्हा ऋतुबदल होतो आणि सृजनाचे कार्य करणाऱ्या पावसाला सुरुवात होते. पहिल्या पावसाचे उत्साहात स्वागत झाले. तरी त्यानंतर सहस्र धारांनी कोसळणारा पाऊस मनुष्याची हमखास तारांबळ उडवतो. गाड्या बंद पडतात, पाणी रस्त्यावर तुंबायला लागतं. त्यामुळे सुरुवातीला पावसाच्या प्रेमात असलेला मनुष्य लगेच त्याला दूषणं देऊ लागतो. वस्तुत: गाड्या बंद पडणे किंवा पाणी तुंबणे या मानवनिर्मित अडचणी असतात, परंतु त्याकरिता दोषी मानण्यात येतं ते पावसाला. म्हणून पुढचा संकल्प सांगितलाय, 'वर्शन्तं न निंदेत् तद् व्रतम्' अर्थात पावसाची निंदा न करणं हे व्रत! ऊन, पाऊस, थंडी ही खरं तर निसर्गाची स्वाभाविक रूपं आहेत. देहसुखाला आसावलेला आधुनिक मनुष्य निसर्गातला थोडासाही बदल सहन करू शकत नाही. आयुष्यातील द्वंद्व सहन करण्याची क्षमता निर्माण करण्यासाठी ऊन, पाऊस, थंडीची निंदा न करण्याचा संकल्प अतिशय उपयुक्त आहे. संकल्पाने सहनशीलता वाढली की, गावात थंडी पडली म्हणून त्या थंडीची कृतीशून्य निंदा करण्यापेक्षा संरक्षणासाठी बंडी कशी निर्माण करता येईल याचा विचार करून मनुष्य कृती करतो. हा या संकल्पाचा गुह्यार्थ!

त्याबरोबरच पुढील महत्त्वाचा संकल्प म्हणजे, 'पशुं न निंदेत् तद् व्रतम्' अर्थात पशू-पक्ष्यांची निंदा न करण्याचे व्रत. याचाच उपभाग असलेला संकल्प म्हणजे 'मज्ज्ञो नाश्‍नीयात् तद् व्रतम्' म्हणजेच मनोरंजनासाठी किंवा केवळ जिव्हा-लौलुप्यासाठी पशुहत्या न करण्याचा निश्‍चय. पशूंची अकारण निंदा घडू नये यासाठी आपल्या संस्कृतीने प्रत्येक प्राण्याला, अगदी उंदरासारख्या लहान प्राण्यालाही त्यातून न वगळता कुठल्यातरी देवतेचं वाहन बनवून टाकलंय. प्रत्येक पशू हा निसर्गचक्राचा एक अविभाज्य घटक आहे आणि निसर्गातल्या कोणत्याही घटकाची तिरस्कारयुक्त निंदा ही पर्यायाने मानवासाठीच घातक ठरू शकते हा बोध या संकल्पातून मिळतो.

यानंतर सांगितला गेलेला महत्त्वाचा संकल्प म्हणजे 'लोकान् न निंदेत् तद् व्रतम्'. लोक याचा अर्थ जे आपले अवलोकन करतात ते. मनुष्य नेहमी आपल्या दोषांकडे कानाडोळा करून दुसऱ्याच्या दोषांवर बारीक नजर ठेवून असतो. त्यातूनच लोकनिंदेसारख्या हानीकारक सवयीचा जन्म होतो. 'निंदक तो परउपकारी' अशी उपहासात्मक पदवी निंदकाला देऊन तुकाराम महाराजांनी 'आपल्या मुखाच्या संवदणीत, जिभेच्या साबणाने दुसऱ्याची पापं फुकट धुऊन देणारा तो निंदक' अशी त्याची रोखठोक व्याख्याच केली आहे. कोणत्याही प्रकारच्या परनिंदेमुळे आपली एकाग्रता तर भंग पावतेच. शिवाय ज्याची निंदा आपण करतो आहोत त्याच्यावरच एकाग्रता झाल्याने त्याचे अवगुण आपल्यात संचरित होण्यास सुरुवात होते. परनिंदेतून पुढे त्याचा प्रवास समतेऐवजी विषमतेकडेच होतो. निंदेमधल्या सुप्त संहारक शक्तीची जाणीव औपनिषद काळातल्या ऋषी-मुनींना होती, पण आधुनिक मानवाला त्याचा विसर पडला आहे हे आपलं दुर्दैव!

मनुष्यजन्माचा आदि आणि अंतिम असा सर्वोच्च संकल्प म्हणजे 'मीच विश्‍व आहे, मीच ईश्‍वर आहे' या सत्याची ओळख करून घेणे. त्याकरिता औपनिषदिक व्रतसंकल्पांचा उपसंहार 'सर्वम् अस्मि इति उपासित' या शेवटच्या व्रतात होतो. अशा अद्वैतानुभूतीसाठी नुसती ईश्‍वरी प्रार्थना उपयोगी ठरत नाही, तर त्याला मानवासह निसर्गाच्या कोणत्याही घटकाची निंदा टाळण्यासारख्या कृतीयुक्त सत्संकल्पाची जोड द्यावी लागते. येणाऱ्या वर्षारंभी अशी सत्संकल्पाची गुढी उभारून आणि कृत्निश्‍चयाचं तोरण बांधून नववर्षाचं स्वागत आपल्याला करता आलं पाहिजे.

- बापट गुरुजी

आपली प्रतिक्रिया कळवा



Ads by Guruji

